
# पंचधारा

वर्ष ६५ वे, अंक दुसरा
जुलै २०२३ ते सप्टेंबर २०२३
अधिक श्रावण ते भाद्रपद १९४४



## माध्यमांतर आणि प्रकारांतर विशेषांक

मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य, हैदराबाद

RNI Reg. No. 32307/79

मूल्य : १२५/-

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ पुरस्कृत
मराठी साहित्य परिषद, (तेलंगण राज्य) या संस्थेचे त्रैमासिक मुखपत्र

# पंचधारा

## माध्यमांतर आणि प्रकारांतर विशेषांक

वर्ष ६६ वे, अंक दुसरा
जुलै २०२३ ते सप्टेंबर २०२३
आषाढ ते भाद्रपद १९४५

## संपादक मंडळ

डॉ. विद्या देवधर (प्रमुख संपादक)
माधव रामराजे चौसाळकर
डॉ. शैलजा जोशी
मीना जहागिरदार
व्यंकटेश कुलकर्णी
डॉ. गायत्री शिरोळे
या अंकासाठी संपादन सहाय्य : प्रा. चिन्मय मधू घैसास

**मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य**
इसामिया बाजार, हैदराबाद – ५०० ०२७
RNI Reg. No. : 32307/79

कार्यवाह
म. सा. प. तेलंगण राज्य
४-६-४५८, इसामिया बाजार, हैदराबाद – ५०० ०२७.
भ्रमणध्वनी : ७८४२८५३९८४
(संपर्क : सायंकाळी ५ ते ८) अन्यवेळी लिखित संदेश पाठवावे.

प्रकाशक
डॉ. विद्या देवधर

सर्व हक्क : म. सा. प. तेलंगण राज्य

या अंकात प्रकट झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.
फक्त एक व तीन वर्षांची वर्गणी स्वीकारली जाईल.
पंचधारेच्या आर्थिक व्यवहाराचे वर्ष एप्रिल ते मार्च असे आहे.
सर्व सभासदांनी आपले E-mail ID फोन नंबर
पुढील क्रमांकावर पाठवावेत. ७८४२८५३९८४
संपर्कासाठी : MAIL ID : mspaphydgmail.com

पंचधारा वर्गणी Marathi Sahity Parishad
IDBI Bank, Kachiguda Branch
A/C. No. 59410010000125 किंवा Panchdhara
A/C. No. 59410010001359, IFSC Code – IBKL0000594
(For both accounts) या खात्यावर जमा करावी. मनीऑर्डर पाठवू नये.

वार्षिक वर्गणी रु. ४००/-
तीन वर्षांची वर्गणी रु. १०००/-
आजीव सदस्य वर्गणी रु. ४०००/-
(वर्गणी शक्यतो डी. डी. ने पाठवावी)
बाहेरगावचा चेक असल्यास वटणावळीचे रु. ३५/- अधिक पाठवावेत, ही विनंती
या अंकाचे मूल्य : रु. २००/-
टपाल खर्च : रु. ३५/-

अक्षरजुळणी व मुखपृष्ठ : अमोघ आर्ट्स, पुणे ३०.

मुद्रक : श्रीगणेश मुद्रणालय, ३५७, शनिवार पेठ, पुणे ३०.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या अंकात प्रकट झालेल्या मतांशी आणि निष्कर्षांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका

संपादकीय ........................................................................................ ५

**भावपूर्ण श्रद्धांजली :**
मला भावलेल्या मालिनीताई राजूरकर ................ भारत देगलूरकर ................... ९

माध्यमांतराच्या अध्यापन-संशोधनातील अडचणी... प्रा. चिन्मय मधू घैसास
डॉ. योगेश शेळके .............. १४

रंग किरमिजी :
काव्य ते गीत : सर्जनाचा चिद्विलास .................. प्रवीण दवणे ...................... १९

मराठी कादंबरीचे चित्रपट माध्यमांतर ................. डॉ. राजेंद्र थोरात ............... २३

पेशवाईवर आधारित ऐतिहासिक
कादंबऱ्यांचे प्रकारांतर आणि माध्यमांतर ............. डॉ. विनय मडगांवकर.......... ३३

ग्रामीण कादंबऱ्यांचे माध्यमांतर :
(निवडक कादंबऱ्यांच्या संदर्भात) ..................... प्रा. विनायक ल. बापट ........ ४७

लोककला आणि लोकसमजुतींवर आधारित
कादंबऱ्यांचे माध्यमांतर : (चंद्रमुखी आणि जोगवा
चित्रपट यांच्या विशेष संदर्भात)....................... प्रा. जयेश गावकर.............. ५७

'महानंदा' कादंबरीचे माध्यमांतर :
नाटक : गुंतता हृदय हे ................................ हेमंत बाळकृष्ण अय्या......... ६९

माध्यमांतरातील आधुनिक आयाम :
कादंबरी ते वेबसेरिज ................................... तन्वी चाफाडकर ............... ७८

चरित्र-आत्मचरित्रात्मक साहित्यकृतींचे माध्यमांतर .. प्रा. चिन्मय मधू घैसास ........ ८६

चरित्र ग्रंथावरून चित्रपटनिर्मिती :
एक आनंददायी अनुभव ............................... डॉ. विद्या देवधर ............... ९६

नाटक ते सिनेमा : माध्यमांतर ........................ डॉ. गायत्री शिरोळे ........... १०६

कथेचे माध्यमांतर : 'जगावेगळा संसार'
या कथेच्या अनुषंगाने .................................. पूर्वा पंडित वस्त ............. १११

वरनभात लोन्चा नि कोन नाय कोन्चा :
कथेचे माध्यमांतर ........................................ रोहिणी नेवरेकर .............. १२०

व्हिक्टर ह्युगोच्या साहित्याचे माध्यमांतर ............ क्षमा धारवाडकर ............. १२८

पुस्तक परीक्षण :

१ 'दीपस्तंभ' : एक महत्त्वपूर्ण दस्तावेज ...... डॉ. शुभांगी पातुरकर ......... १३५

२ मंतरलेली उन्हे .................................. प्रा. हिरा वाघ ................. १३९

३ युगभान जागवणारी कविता .................. अंजली कुलकर्णी ............ १४२

मराठी साहित्य परिषद कार्यवृत्त ............................................... १४७

लेखक परिचय ........................................................................ १५०

स्वागत नव्या पुस्तकांचे ............................................................. १५५

■

# माध्यमांतराच्या अध्यापन-संशोधनातील अडचणी

प्रा. चिन्मय मधू घैसास
डॉ. योगेश शेळके





## प्रस्तावना

साहित्यकृतीच्या माध्यमांतराचा विचार करताना साहित्य व माध्यम अशा दोन घटकांचा विचार करावा लागतो. हे दोन्ही घटक मानवी विचारांना अभिव्यक्त करण्याचे कार्य करीत असतात. कथा, कविता, कादंबरी, नाटक, चित्रपट यांच्या माध्यमातून मानवी जीवनपट उलगडण्याच काम साहित्य करीत असते. या माध्यमांचे साधन वेगळे असले तरी त्यांचे अंतिम ध्येय एकच असते. माध्यमांतरासाठी साहित्यकृतीही श्रेष्ठ दर्जाची असावी लागते. साहित्यकृतीच्या माध्यमांतरासाठी त्या साहित्यकृतीत लपलेल्या कथेचा शोध घ्यावा लागतो. हा शोध घेणे एक आव्हान असते. माध्यमांतर म्हणजे ढोबळमानाने एका वस्तूचे दुसऱ्या वस्तूत रूपांतर करणे होय. माध्यमांतर या संकल्पनेला समांतर काही शब्दप्रयोग वापरले जातात उदा. रूपांतर, प्रकारान्तर, अनुभवांतर, माध्यमांतर इत्यादी. माध्यमांतर म्हणजे एका माध्यमातून दुसऱ्या माध्यमात जाणे होय. परंतु ही प्रक्रिया वाटते तितकी सोपी नाही. ही अत्यंत गुंतागुंतीची प्रक्रिया असते. साहित्यकृतीचे माध्यमांतर करत असताना त्या साहित्यकृतीच्या मूळ गाभ्याला धक्का लागू नये अशी अपेक्षा असते.

## मूळ साहित्यकृतीतून माध्यमांतर

कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र यांचे माध्यमांतर करताना मूळ आशयाला धक्का न लावता तो एका माध्यमातून दुसऱ्या माध्यमात नेणे म्हणजे माध्यमांतर होय. त्या-त्या माध्यमांची वैशिष्ट्ये व मर्यादा लक्षात घेऊन हे माध्यमांतर करणे आवश्यक असते. उदा. साने गुरुजींच्या 'श्यामची आई' या कादंबरीचे नाटक होते, चित्रपट होतो व दूरदर्शनवर मालिकाही होते. "साहित्यकृतीवर सिनेमा करणे अवघड आहे. 'कोसला'वर चित्रपट करायचा म्हटला तर माझ्यासाठी अवघड आहे" असे भाष्य नागराज मंजुळेसारखा साहित्यिक,

निर्माता, दिग्दर्शक करतो. म्हणजे प्रत्येक साहित्यकृतीवर चित्रपट होईलच असे नाही, तसा प्रयत्नही करू नये. कारण त्या साहित्यकृतीचे माध्यमांतर करताना काटछाट करावी लागते. कोसला सारख्या कादंबरीला दीड तासात दाखवणे अवघड आहे. मुळात कोसला सारख्या कादंबरीतील प्रसंगांची काटछाट ही तारेवरची कसरत आहे. कोसला कादंबरीतील पांडुरंग सांगवीकर जेव्हा अजिंठ्याचे वर्णन करतो ते वर्णन चित्रपटात दाखवणे हे कसब आहे. अशा अनेक घटकांकडे संशोधकांना लक्ष द्यावे लागते. साहित्यकृतीच्या माध्यमांतराचे अध्ययन करीत असताना साहित्य व माध्यम यांची योग्य सांगड घालणे आवश्यक ठरते. संशोधक किंवा अध्यापक जर बहुश्रुत, चांगला वाचक, कलेची जाण नसणारा, घटना प्रसंगाचे कार्यकारण भाव न जाणणारा असेल तर माध्यमांतर समजून घेताना अडचणी निर्माण होतात.

माध्यमांतर या विषयाचे अध्यापन करणाऱ्या अध्यापक व संशोधकाजवळ काही साहित्यिक मुद्द्यांची माहिती आणि अनुभव देखील असावा लागतो. माध्यमांतराची अंतिम चौकट ही चित्रपटाच्या स्वरूपात असल्याने अध्यापक-संशोधकाला चित्रपट या माध्यमाची आवड मुळात असणे हे महत्त्वाचे ठरते. आस्वादक आणि समीक्षणात्मक अशा दोन्ही भूमिकांतून त्यांना चित्रपटाचा विचार करावा लागतो. त्याचप्रमाणे चित्रपटनिर्मिती प्रक्रियेत असणाऱ्या कलाकार निवड, कॅमेरा तंत्र, दिग्दर्शन, नेपथ्य योजना, चित्रिकरण स्थलनिश्चिती यासारख्या तांत्रिक घटकांचाही तसेच चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद, गीते यांचा देखील अभ्यास अध्यापक, संशोधकाने करावा लागतो. मूळ साहित्यकृतीच्या तुलनेत चित्रपटाच्या चौकटीत रूपांतरित होत असताना मूळ आशय, सर्व पातळ्यांवर कसा बदलला आहे याचा अभ्यास करण्यासाठी चित्रपट या माध्यमाच्या तांत्रिक तसेच अन्य घटकांचा त्यांनी अभ्यास आणि विचार करणे अत्यावश्यक ठरते. मूळ साहित्यकृती कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, चरित्र, आत्मचरित्र, व्यक्तीचित्रण अशा कोणत्याही प्रकारची असू शकते. त्यामुळे या सर्व साहित्यप्रकारांचाही अभ्यास खोलात असावा लागतो. या अभ्यासाच्या मदतीने अध्यापक, संशोधकाला माध्यमांतराचा अभ्यास करणे शक्य होते.

### चित्रपटाची उपलब्धता

साहित्यकृतीच्या माध्यमांतराचे अध्यापन-संशोधन करताना साहित्यकृती अनेकदा उपलब्ध होते परंतु माध्यमांतरित चित्रपट मात्र अनेकदा उपलब्ध होत नाही. विशेषतः जुने चित्रपट मिळवताना दमछाक होते. वास्तविक वेगवेगळ्या आधुनिक

माध्यमांच्या मदतीने चित्रपट सहज उपलब्ध असायला हवेत परंतु तसे होताना दिसत नाही. अनेकदा, चित्रपटगृहात प्रदर्शित झाल्यानंतर काही दिवसातच चित्रपट जणू काही गायब होतो. त्या चित्रपटाची ध्वनीचित्रफीत अर्थात सीडी देखील उपलब्ध होत नाही. त्यामुळे एखाद्या जिज्ञासू अभ्यासकाला वणवण फिरावे लागते. अशातच, अध्यापन-संशोधनाची नितांत गरज म्हणून, इच्छा नसतानाही, अनधिकृत माध्यमांवरून चित्रपट मिळवण्याचा प्रयत्न करण्यास अध्यापक-संशोधकाला भाग पडावे लागते. वास्तविक, एखादा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर एका विशिष्ट काळानंतर तो कोणत्या ना कोणत्या माध्यमाद्वारे अध्यापक-संशोधकांना अभ्यासासाठी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने विचार होणे काळाची गरज आहे. ज्याप्रकारे एखाद्या साहित्यकृतीची छापील आवृत्ती प्रसिद्ध होते तसे चित्रपटाच्या बाबतीत करता येणे शक्य आहे. चित्रपट या माध्यमाचा स्वतंत्रपणे अभ्यास असो वा माध्यमांतर या ज्ञानशाखेचा अभ्यास असो, या बाबी आज अध्यापनाच्या तसेच संशोधनाच्या मुख्य प्रवाहात आलेल्या आहेत याचीच जाणीव बहुतांश चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शकांना आहे का हा मुळात प्रश्न पडतो.

## संबंधित संस्था आणि मंत्रालयाची भूमिका

चित्रपट निर्मिती आणि प्रदर्शन याच्याशी संबंधित सरकारी संस्था, अधिकारी आणि सरकारच्या विविध मंत्रालयांची भूमिका या कामी अत्यंत महत्त्वाची आहे. चित्रपट हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून ते संशोधन व अभ्यासाचे महत्त्वाचे केंद्र आहे. असे असले तरी, अभ्यासकांना चित्रपट सहज उपलब्ध होतील यासाठी विशेष प्रयत्न झालेले दिसत नाही. सरकारने धोरणात्मक निर्णय घेऊन चित्रपटाच्या ध्वनीचित्रफीत अर्थात सीडी अथवा अन्य मार्गाने चित्रपटाची प्रत अध्यापन-संशोधनासाठी उपलब्ध करून देण्याची व्यवस्था केली पाहिजे. एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात, काही कंपन्यांनी स्वतः निर्मिती केलेल्या वा अन्य निर्मात्यांकडून त्यांच्या चित्रपटांचे अधिकार विकत घेऊन चित्रपटाची सीडी अत्यल्प दरात बाजारपेठेत उपलब्ध करून दिली होती. यामुळे अभ्यासक, अध्यापक संशोधक यांना चित्रपटाची प्रत अधिकृतरित्या माफक दरात आणि सहजपणे उपलब्ध होत असे. दुसरीकडे चित्रपट निर्मितीच्या काही काळानंतर चित्रपटाच्या प्रदर्शनातून येणारे थेट उत्पन्न बंद झाल्यावर, अशा पद्धतीने सीडीच्या विक्रीतून देखील निर्मात्याला थोडाफार आर्थिक लाभ होऊ शकतो. अलीकडच्या काळात दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीने अतिशय स्तुत्य असा उपक्रम करत, दर्जेदार

नाट्यसंस्थांच्या सहकार्याने अनेक नाटकांची आपल्या स्टुडियोत खास ध्वनीचित्रमुद्रणे करवून घेऊन ही सर्व नाटके विनामूल्य आपल्या अधिकृत यूट्यूब वाहिनीवर उपलब्ध करून दिली आहेत. यामुळे नाट्याभ्यासकांना नाट्यप्रयोगाची उपलब्धता झाली असून त्याचा फार मोठा लाभ अध्यापन आणि संशोधनात होताना दिसतो. चित्रपट ही फक्त व्यावसायिक उद्दिष्टाने निर्माण करायची गोष्ट नसून ती अध्यापन, संशोधनाच्या पातळीवरही तेवढीच महत्त्वाची आहे याचा विचार होणे आवश्यक आहे. चित्रपट निर्मात्यांनी जरी या गोष्टीचा व्यावसायिक विचार केला तरी देखील त्यांच्यासाठी लाभदायक अशी एक संधी यात आहे.

### दोन वेगवेगळी माध्यमे

साहित्य आणि माध्यमे यांचा एकत्र विचार करताना या दोन्ही कलांचे साम्य-भेद संशोधकाने लक्षात घेणे आवश्यक आहे. कथा, कादंबरीत येणारा अवकाश आणि चित्रपटातील अवकाश यात मूलभूत फरक असतो. अनेक वेळा मूळ कलाकृतीत काही बदल केले जातात. उदा. नटसम्राट नाटकात आप्पासाहेब बेलवलकरांना कोणीही मित्र नाही; परंतु चित्रपटात मात्र मित्र आहे. अर्थात हे बदल अत्यंत जुजबी स्वरूपाचे असतात. दिग्दर्शक चित्रपट निर्माण करताना मूळ साहित्यकृतीशी, लेखकाच्या दृष्टिकोनाशी किती प्रामाणिक राहिला याचाही शोध घेणे आव्हानात्मक काम असते. अर्थात दिग्दर्शकाने नेमकी बांधिलकी कशाशी ठेवावी हाही एक महत्त्वाचा प्रश्न उरतोच. कारण दिग्दर्शकाने साहित्याच्या बाह्यरूपाशी प्रामाणिक राहावे की अंतर्गत अर्थसंगतीशी, हा प्रश्न निर्माण होतो.

### आस्वाद प्रक्रिया

वाचक म्हणून आपण साहित्यकृतीचा व प्रेक्षक म्हणून चित्रपटाचा आस्वाद घेत असतो परंतु या दोन्हींच्या आस्वादात मूलभूत फरक आहे. कादंबरीचा आस्वाद आपण सोयीनुसार घेऊ शकतो. याउलट चित्रपट आपल्याला चित्रपटगृहात सामूहिकरित्या पाहावा लागतो. त्यात दिग्दर्शकाने जे चित्रण केले आहे तेच पाहावे लागते. कादंबरीत मात्र प्रत्येक वाचकाला वेगवेगळा अनुभव येत असतो. अभ्यासक व संशोधकांना या घटकांचा विचार करावा लागतो. दिग्दर्शक हा उत्तम आस्वादक असला पाहिजे. साहित्यकृतीतील नेमका कोणता भाग टाळावा आणि जो भाग टाळला त्याची भरपाई कुठे व कशी करायची हे आव्हान दिग्दर्शकासमोर असते.

## समारोप

माध्यमांतराचे अध्यापन, संशोधन करताना येणाऱ्या अडचणींचा विचार करता त्यावर काही उपाय देखील सांगता येतील :

१. चित्रपट निर्माता व लेखक यांच्यात समन्वय असेल तर साहित्यकृतीचे माध्यमांतर उत्तम होऊ शकते. अन्यथा असे प्रयोग फसण्याची शक्यता असते.
२. माध्यमांतर यशस्वीपणे रुजवण्यासाठी सामान्य वाचक व प्रेक्षक यांना दृश्य माध्यमाची व वाचन संस्कृतीची ओळख होणे गरजेचे आहे.
३. साहित्यकृतीचे माध्यमांतर होते परंतु माध्यमांतराचे साहित्यकृतीत रूपांतर होत नाही. हे होणे ही काळाची गरज आहे.
४. संशोधकाने साहित्य आणि माध्यमे या दोन स्वतंत्र स्वायत्त माध्यमांचे पुरेसे ज्ञान प्राप्त करून घेणे आवश्यक आहे.
५. माध्यमांतराच्या उत्तम अध्यापन आणि संशोधनासाठी त्या साहित्यकृतीच्या जोडीलाच चित्रपटही उपलब्ध होणे नितांत आवश्यक आहे. याकामी संबंधित संस्था आणि सरकारी विभाग यांनी लक्ष देणे योग्य ठरते.
६. माध्यमांतर या संकल्पनेचा सैद्धांतिक विचार करण्याच्या दृष्टीने अधिकाधिक संशोधकांनी त्याकडे लक्ष देऊन आपापली मते, विचार, सिद्धांत मांडण्याची गरज आहे.

## संदर्भ

१. साहित्यकृतीचे माध्यमांतर (संपा.), डॉ. राजेंद्र थोरात व डॉ. आशुतोष कसबेकर, संस्कृती प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २०१७, पृ.३४
२. उनि, पृ. ६

■

# लेखन कार्यशाळेतील काही क्षणचित्रे







